CMYK


ऋशांक चव्हाण व डॉ. ऋतुजा चव्हाण यांच्याकडून विविध गणरायांची आरती >> पान 2

१३२ वर्षांपूर्वी लोकमान्य टिळकांनी सर्वप्रथम गणेश मुर्तीचे प्रतिष्ठापना केली त्या चाळीत आजही तिच परंपरा >> पान 3

डोणगावात वाहतूक व्यवस्थेचे तीनतेरा : अवैध वाहतूक जोमात >> पान 4


**सुविचार**

जीवनातील काही पराभव हे विजयाहूनही अधिक श्रेष्ठ असतात.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034


मी शहीद होण्यास तयार; मनोज जरांगेंच्या वक्तव्यामुळे राजकारणात खळबळ



आतील पान


■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 35 ■ बुधवार, दि. 11 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# विदर्भात पुन्हा कोसळधार!

## या जिल्ह्यांना पुढील ३ दिवस रेड अलर्ट

### अनेकांच्या घरांसह गणरायांच्या मंडपातही पाणीच पाणी; डिझेल टँकरही गेला वाहून

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी : नागपूरसह विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांना दमदार पावसाने अक्षरक्ष: झोडपून काढले आहे. या मुसळधार पावसामुळे अनेक भागात जलमयस्थिती निर्माण झाली असून अनेकांच्या घरात पावसाचे पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. तर, अनेकांच्या शेतातील हातातोंडाशी आलेला भात पीक आणि इतर पिके जमीनदोस्त झाल्याचे चित्र आहे.**

या पावसाचा सर्वाधिक फटका पूर्व विदर्भातील भंडार, गोंदिया, चंद्रपुर, गडचिरोलीसह आसपासच्या गावांना बसला आहे. तर अनेक गणेश मंडळात देखील पाणी शिरल्याचे बघायला मिळाले आहे. सोमवारपासून पावाचा जोर वाढल्याने अनेक गावांचा संपर्क तुटल्याचीही माहिती पुढे आली आहे. ऐकुणात या पावसाने सर्वत्र एकच दाणादाण उडवल्याचे चित्र आहे.

गोंदिया जिल्ह्यात सध्या मुसळधार पाऊस सुरु आहे. दरम्यान, वाघनदीकाठच्या गावांना सतर्कतेच्या इशारा देण्यात आला असताना सुद्धा लोहारा जवळील वाघ नदीपात्रामध्ये एक डिझेलचा टँकर रस्त्यावरून गेला. दरम्यान हा डिझेलचा टँकर पाण्यात वाहून गेल्याच व्हिडिओ सध्या समाज मध्यमांमध्ये मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. वारंवार प्रशासनाने सतर्कतेच्या इशारा



देऊनही या ट्रक चालकाने पुलावरून पाणी वाहत असताना आपला ट्रक टाकला आणि पाण्यामध्ये वाहून गेला आहे.

दरम्यान, अकोल्यातल्या मोर्णा नदीपात्रात गेल्या २४ तासात दोन मृतदेह आढळून आले आहेत. यात एका ६ वर्षीय बालकाचा मृतदेह मोर्णा नदीच्या पाण्यात तरंगताना दिसून आलाय. या घटनेनंतर पुन्हा राजेश्र्वर सेतू पुलाजवळ एका ५६ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळलाय. आढळून आलेल्या दोन्ही मृतदेहाचे अंतर हे अर्धा किमीपर्यंत होतं. तर दोन्ही मृतकांची ओळख समोर आली असून ६ वर्षीय बालकाचे नाव दुर्गेश अनिल भालेराव असल्याचे समोर आले आहे. ज्याची बेपत्ता असल्याची तक्रार आधीच पोलिसांकडे दाखल होती. तर दुसऱ्या घटनेतील राजेश्र्वर सेतू पुलाजवळ आढळलेला मृतदेह सिंधी कॅम्प येथील लक्ष्मण मोहन ढोकणे यांचा असल्याची माहिती समोर आलीय. सध्या अकोला पोलीस या प्रकरणांचा तपास करत असून, मृत्यूच मूळ कारणाचा तपासही पोलीस शोधत आहेत.

गोंदिया शहरात सोमवारच्या रात्रीपासून सुरू असलेल्या पावसामुळे अनेक भागात पाणी शिरले आहे. गोंदिया शहरातील खाजगी सहयोग रूग्णालयमध्ये देखील पावसाचे पाणी शिरले असून यामुळे रुग्णालयातील साहित्याची नासधुस झालेली आहे. तर सरकारी बाई गंगाबाई रुग्णालयात देखील पाणी शिरल्याची माहिती पुढे आली आहे. या दोन्ही रुग्णालयात पाणी शिरल्याने रूग्णालय प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली आहे.

दुसरीकडे पुरात अडकलेल्या तीन लोकांना वाचविण्यात स्थानिक प्रशासनाला >> पान २

## गोंदियात मुसळधार पावसाचा कहर; इमारत कोसळल्याने मायलेकाचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी** : जिल्ह्यात मुसळधार पावसाने कहर केला आहे. आज पहाटे शहरालगतच्या एका नाल्याला पूर आल्यामुळे लगतची एक दुमजली इमारत नाल्यात कोसळली. यामुळे मायलेकाचा मृत्यू झाला. गोंदिया जिल्ह्यात आज पहाटेपासून मुसळधार पाऊस सुरू आहे.

ढगफुटीसदृश्य पावसामुळे संपूर्ण जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे शहराजवळील फुलचूर नाल्याला पूर आला. नाल्यातील पाणी वाढल्याने लगतच असलेली दोन मजली इमारत थेट नाल्यात कोसळली. यामुळे पाण्यात वाहून गेल्याने आईचा, तर घराच्या ढिगाऱ्याखाली दबल्याने मुलाचा मृत्यू झाला. दिपिन अग्रवाल (२७) व किरण अग्रवाल (५०), अशी मृतांची नावे आहेत, तर अनिल अग्रवाल (५२) हे या दुर्घटनेतून थोडक्यात बचावले. घराच्या ढिगाऱ्याखालून दीपिन अग्रवाल याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला, तर नाल्याच्या पाण्यात वाहून गेलेल्या किरण अग्रवाल यांचा मृतदेह प्रशासनाच्यावतीने राबवण्यात आलेल्या शोधमोहिमेत आढळून आला. या दोघांचे मृतदेह उत्तरीय तपासणीकरिता शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले.

गोंदिया जिल्ह्यात आज पहाटेपासून सुरू असलेल्या पावसामुळे प्रशासनाने सावधानतेचा इशारा दिला आहे. मात्र, त्याकडे नागरिक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. मुसळधार पावसामुळे वाघ नदीला पूर आला असून ही नदी दुथडी भरून वाहात आहे. याच नदीत एक डिझेल टँकर वाहून गेल्याची घटना आज सकाळी ७:३० वाजताच्या सुमारास घडली. या घटनेचा व्हीडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. देवरी तालुक्यातील वाघ नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला आहे. मुसळधार पावसामुळे वाघ नदीला पूर आला आहे. असे असतानाही एका चालकाने आपला टँकर नदीपात्रातून घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पाण्याचा प्रवाह जास्त असल्यामुळे टँकर वाहून गेला.

नागरिकांच्या घरांत शिरले पाणी >> पान २

## ट्रॅकवर सिमेंटचा मोठा ब्लॉक, वेगाने येणारी ट्रेन अन् नंतर; सोलापुरातील घटनेनंतर खळबळ

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी** : उत्तर प्रदेशच्या कानपूर आणि राजस्थानच्या अजमेरनंतर आता सोलापुरात मालगाडीचा अपघात करण्याचा कट आखण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कुर्डुवाडी स्थानकापासून जवळपास एक किमी दूर रेल्वे ट्रॅकवर सिमेंटचा मोठा दगड सापडला आहे. लोको पायलटने प्रसंगावधाना दाखवल्याने दुर्घटना टळली. याप्रकरणी रेल्वेच्या सिनिअर सेक्शन इंजिनिअरने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.



सोलापूरमधील कुर्डुवाडी रेल्वे स्टेशनपासून जवळपास ७०० मीटर दूर सिग्नल पॉईंटजवळ रेल्वे दुर्घटना करण्याच्या हेतूने एक मोठा दगड ठेवण्यात आला होता. याप्रकरणी सिनिअर सेक्शन इंजिनिअर कुंदन कुमारने अज्ञात आरोपींविरोधात तक्रार दाखल केली आहे. >> पान २

## काँग्रेसकडून उमेदवार ठरला!

### नांदेड लोकसभेच्या पोटनिवडणूकीत दिवंगत वसंत चव्हाणांच्या चिरंजीवाचीच शिफारस

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : नांदेडचे दिवंगत खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनानंतर नांदेडमध्ये लोकसभा पोटनिवडणूक लागण्याची शक्यता आहे. आगामी विधानसभेच्या पार्श्र्वभूमीवर नांदेडमध्ये लोकसभेच्या पोटनिवडणुकीत दिवंगत खासदार वसंत चव्हाण यांचे चिरंजीव रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी देण्याचा काँग्रेसने ठराव एकमताने पारीत केला आहे. जिल्हा आणि शहर काँग्रेस कमिटीच्या बैठकीत हा ठराव मांडण्यात आला होता. यावर सर्वांचे एकमत झाले. नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसकडून उमेदवार ठरला असून त्यावर पक्षाकडून शिक्कामोर्तब होणे बाकी आहे.

खासदार वसंत चव्हाणयांचा २६ ऑगस्ट रोजी अकाली निधन झाले. त्यांच्या निधनानंतर नांदेडमध्ये लोकसभा पोटनिवडणूकीसाठी भाजपमध्ये उमेदवारीसाठी काही नावे समोर येत असताना काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी दिवंगत वसंत चव्हाण यांच्या मुलाला रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी देण्याचा ठराव मांडलाय.

खासदार वसंतराव चव्हाण यांच्या अकाली निधनामुळे नांदेड लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक लागण्याची शक्यता दाट झाली आहे. खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निवडणुकीतील प्रचार व इतर सर्व बाबींचा नियोजनात रवींद्र चव्हाण यांचा मोठा वाटा होता.

मधल्या काळात त्यांनी काँग्रेसकडे विधानसभेसाठीही अर्ज केला होता. परंतु वसंत चव्हाण यांच्या अकाली निधनानंतर पक्षातर्फेच रवींद्र चव्हाण यांनी पोट निवडणूक लढवावी अशी भूमिका घेण्यात आली आहे. यासाठी एकमताने ठराव मंजूर झाला असून हटराव प्रदेश काँग्रेस कडे केली जाणार असल्याचं सांगण्यात आलं. जेष्ठ नेते ईश्र्वरराव भोसीकर यांनीही या बैठकीत रवींद्र चव्हाण हेच पक्षाच्या उमेदवारीचे हक्कदार ठरतात, असे नमूद केले.

लोकसभा निवडणुकीत भाजपच्या प्रतापराव चिखलीकर यांना पराभवाची धूळ चारुन नांदेड जिल्ह्यातील अशोक चव्हाण आणि भाजपच्या अजस्त्र ताकदीला धक्का देत विजय खेचून आणणारे काँग्रेसचे आमदार वसंत चव्हाण यांचे २६ ऑगस्ट रोजी अकाली निधन झाले. त्यांच्या जाण्याने काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला आहे. वसंत चव्हाण यांची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून ठीक नव्हती. त्यांच्यावर हैदराबाद येथील एका रुग्णालयात उपचार सुरु होते. त्यांच्या अचानक जाण्याने काँग्रेसला वसंत चव्हाणांची गादी त्यांच्या चिरंजीवाने चालवावी असे वाटत असून लोकसभा पोटनिवडणूकीत रविंद्र चव्हाण यांच्या उमेदवारीसह जिल्हा काँग्रेसकडून तसा ठराव संमत करण्यात आला आहे.



सर! अभिनेत्यासोबत नेता बनत आहात, जसा अभिनय चित्रपटात करता तसंच राजकारणातही करा बस्स!

## वृक्ष लागवडीचा फज्जा : कोट्यावधींची लुबाडणूक

### पातुर तालुक्यातील प्रकार : आयुक्ताकडे तक्रार

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर** : पर्यावरणाचा समतोल ठेवण्यासाठी व गाव पातळीवर गोरगरिबांना मजुरी उपलब्ध व्हावे या उद्देशाने शासनाने गेल्या अनेक वर्षांपासून वृक्ष लागवडीची मोहीम सुरू केली, परंतु पातुर तालुक्यात वृक्ष लागवड संगोपणाच्या नावावर शासनाची कोट्यावधी रुपयांची लुबाडणूक होत असल्याचा आरोप शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष दिलीप परनाटे यांनी ५ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी , मुख्य कार्यकारी अधिकारी, व ६ सप्टेंबर रोजी अमरावतीचे विभागीय आयुक्त यांना दिलेल्या तक्रारीतून केला आहे. वृक्ष लागवडीच्या संगोपणावर कोट्यवधी रुपयांची देयक काढणे सुरू आहे. देयक काढण्यासाठी हजारो रुपयांची देवाणघेवाण केली जात असल्याने वृक्ष लागवड मोहिमेचा फज्जा उडाल्याचे चित्र असून, अभियंता व ऑपरेटर यांच्या बँक खात्याची व या सर्व प्रकाराची चौकशी करा अन्यथा जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसण्याचा इशारा शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष दिलीप परनाटे यांनी दिला आहे.सदर आरोपावर अभियंता यांच्याशी विचारणा केली असता, त्यांनी आरोप फेटाळले.

### वृक्ष लागवडीची वाढ का खुंटली?

गेल्या अनेक वर्षांपासून पातुर तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत वृक्ष लागवड करण्याची मोहीम सुरू आहे.मात्र वृक्ष लागवडीची वाढ तीन ते पाच फुटापर्यंतच आहे. कोट्यावधी रुपये काढल्यानंतरही वृक्षाची वाढ का खुंटली असा प्रश्न उपस्थित होत आहे.




### लाचलुचपत विभागाकडे तक्रार

वृक्ष संगोपनाचे देयक काढण्यासाठी दबाव तंत्राचा वापर करून अभियंता व ऑपरेटर यांनी रोजगार सेवकाकडून हजारो रुपये फोन पे वर स्वीकारले असा आरोप रोजगार सेवकाने फोन पे च्या पुराव्यासह लाचलुचपत विभागाकडे दिलेल्या तक्रारीतून केला आहे.

## 'आवाज खाली करा, तुमचा बेशिस्तपणा...' सुप्रीम कोर्टात सरन्यायाधीश 'त्या' वकिलावर चिडले

**मुंबई/प्रतिनिधी** : संपूर्ण देशाला हादरवून टाकणाऱ्या कोलकात्यामधील आर. जी. कर मेडिकल कॉलेजमध्ये ३१ वर्षीय प्रशिक्षणार्थी डॉक्टर तरुणीवर बलात्कार आणि हत्या प्रकरणाची सध्या सर्वोच्च न्यायालयामध्ये सुनावणी सुरु आहे. या सुनावणीदरम्यान सोमवारी (९ सप्टेंबर रोजी) सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी एका वकिलाला आवाज कमी करा असं सांगत दम भरला. तुम्ही न्यायाधीशांबरोबर बोलत आहात की कोर्टाबाहेरील गॅलरीमधून हाका मारत आहात, असा सवाल करत सरन्यायाधीशांचा पार चढल्याचं पाहायला मिळालं. कोलकाता बलात्कार प्रकरणाची सुनावणी सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील त्रिदस्यीय खंडपीठासमोर सुरु आहे. या खंडपीठामध्ये न्या. मनोज मिश्रा आणि न्या. जे. बी. पारदीवाला यांचा समावेश आहे. याच सुनावणीदरम्यान हा सारा प्रकार घडला. सुनावणीदरम्यान वरिष्ठ वकील कपील सिब्बल यांनी वकील आंदोलकांवर दगडफेक करत होते हे दाखवणारे व्हिडीओ आणि फोटो असल्याचा दावा केला.

CMYK

## भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज १२९ वि जयंती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्रह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्र्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# ऋशांक चव्हाण व डॉ. ऋतुजा चव्हाण यांच्याकडून विविध गणरायांची आरती

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : सध्या सर्वत्र गणेश उत्सव सुरू आहे या गणेशोत्सवामध्ये गणेश भक्त विविध ठिकाणी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करत असतात या कार्यक्रमाला विविध राजकीय लोक नेतेमंडळी सामाजिक कार्यकर्ते यांना आमंत्रित करण्यात येत असते याच पार्श्वभूमीवर मेहकर मतदार संघात इच्छुक असलेल्या ऋतुजा चव्हाण व त्यांचे पती डोणगाव अर्बनचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण यांना डोणगाव येथे विविध गणपतीची आरती करण्याचा मान देण्यात आला.

डॉक्टर ऋतुजा चव्हाण ह्या





मेहकर मतदार संघात इच्छुक असून त्यांनी गेल्या काही दिवसापासून आपला संपर्क वाढविला आहे तर अगोदर त्यांची मतदार संघात चांगली ओळख असल्याने त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे तर विविध गणेश मंडळाकडून सुद्धा त्यांना आरतीसाठी बोलण्यात येत आहे.

# पिंपळखुटा केंद्राची शिक्षण परिषद संपन्न




दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर** : पातुर पंचायत समिती अंतर्गत पिंपळखुटा केंद्राची सोमवा ९ सप्टेंबर रोजी पिंपळखुटा येथे शिक्षण परिषद संपन्न झाली, शासनाच्या नवनवीन निकषाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सवलत व्हावे या हेतूने शिक्षण परिषदेचे आयोजन करून शिक्षकांना मार्गदर्शन दिले जातात, याच उद्देशाने पिंपळखुटा केंद्राचे केंद्रप्रमुख अयाज खान, यांच्या मार्गदर्शनात ९ सप्टेंबर रोजी पिंपळखुटा येथे आयोजित केलेल्या शिक्षण परिषदेत केंद्रप्रमुख अयाज खान, काळे सर संतोष पोटदुखे सर नेमाडे सर नरेंद्र डीयूरे सर आदींनी शिक्षकांना मार्गदर्शन केले, यामध्ये शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला, यावेळी पिंपळखुटा केंद्रातील सर्व शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

# मुलीच्या लग्नाची चिंता विसरा, आता सरकार देणार आर्थिक मदत; काय आहे कन्यादान योजना?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : प्रत्येक आई-वडिलांना आपल्या मुलीच्या लग्नाची चिंता लागलेली असते. भारतात लग्नात सर्वाधिक पैसा खर्च केला जातो. एक वडील मुलीच्या लग्नासाठी पै न पै जोडत असतो. लग्नासारखा आनंदी क्षण हा कुण्या कुटुंबाला भार वाटू नये यासाठी महाराष्ट्र सरकारकडून कन्यादान योजना राबवली जाते. सरकारकडून लग्नासाठी कन्यादान योजनेच्या माध्यमातून आर्थिक मदत केली जाते.

अनेक वर्षांपासून राज्य सरकारकडून ही योजना राबवली जात आहे. या योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जातीच्या पालकांना मुलीच्या विवाहाप्रसंगी सरकारकडून आर्थिक मदत दिली जाते. मागासवर्गीय कुटुंबांचे विवाहावर होणाऱ्या अनाठाई खर्चावर नियंत्रण रहावे यासाठी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन म्हणून शासन ही योजना राबवते.

कन्यादान योजनासाठी पात्रता काय?

वधू व वर महाराष्ट्रातील रहिवासी असायला हवेत.

नवदाम्पत्यातील वधू/वर



यापैकी दोन्ही किंवा एक जण हे अनुसूचित जाती (नवबौद्धासह) असावा, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील असावा.

वराचे वय २१ वर्ष व वधूचे वय १८ वर्षापेक्षा कमी असू नये.

वधू-वर यांच्या प्रथम विवाहासाठीच हे अनुदान अनुज्ञेय असेल.

बाल विवाह प्रतिबंध कायदा व हुंडा प्रतिबंध कायद्यांतर्गत असलेल्या कोणत्याही कलमाचा भंग या दाम्पत्य किंवा कुटूंब यांच्याकडून झालेला नसावा. याबाबत लेखी प्रतिज्ञापत्र सादर करावे लागते.(घरपूरवरप धेक्षरपर)

जातीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

आंतरजातीय विवाह असल्यास त्यासाठी ३० जानेवारी १९९९ च्या शासन निर्णयानुसार कोणते फायदे मिळतात तेही फायदे अनुज्ञेय राहतील.

मदत किती आणि कशी दिली जाते?

योजनेच्या माध्यमातून नव विवाहित दाम्पत्याला २०००० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. (मार्च २०२४ मध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी योजनेची आर्थिक मदत २५००० रुपये करण्याची घोषणा केली आहे. ) ही मदत वधू किंवा वर यांच्या पालकांच्या नावे मंजूर होते. मात्र, यासाठी सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी होऊन विवाह करणे बंधनकारक आहे. असे विवाह आयोजित करणाऱ्या संस्थांना प्रत्येक जोडप्यामागे ४००० रुपये मिळतात.

पान १ वरून...

## विदर्भात पुन्हा कोसळधार!

यश आले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन टीम सदस्यांनी तिन्ही लोकांना रेस्क्यू करून बाहेर काढले आहे. देवरी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असल्याने देवरी तालुक्यातील शिरपूर धरणाचे दरवाजे सातही दरवाजे हे साडेतीन मीटर उंचीने उघडण्यात आले आहेत. त्यामुळे वाघनदीला मोठ्या प्रमाणामध्ये पूर आलेला आहे आणि अशाच परिस्थितीत शिरपूर जवळील गावात पुरात दोन पुरुष आणि एक महिला हे अडकले होते त्यांना वाचविण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन टीम ही दाखल झाली असून या तीनही पूर पिडीताना वाचवण्यात यश प्राप्त झाले असून यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे.

## गोंदियात मुसळधार पावसाचा

गोंदिया जिल्ह्यात काल सायंकाळपासून सुरू असलेल्या पावसामुळे जनजीवन पूर्णत: विस्कळीत झाले आहे. शहरातील सखोल भागात पावसाचे पाणी साचून ते घरामध्ये शिरल्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली आहे. घरांत शिरलेल्या पाण्यामुळे जीवनावश्यक वस्तू आणि इतर साहित्याचे प्रचंड नुकसान झाले. प्रशासनाने लवकरात लवकर घरांत शिरलेले पाणी बाहेर काढण्यासाठी उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. दूषित पाण्यामुळे आजार पसरण्याची शक्यता आहे. मध्यरात्रीपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक तालुक्यांचा गोंदिया शहराशी संपर्क तुटलेला आहे.

## ट्रॅकवर सिमेंटचा मोठा ब्लॉक

रेल्वे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी रात्री जवळपास ८.३० वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने कुर्डुवाडी रेल्वे स्थानकापासून ७०० मीटर अंतरावर सिमेंटचा दगड ठेवला होता. यादरम्यान लोको पायलट रियाज शेख आणि जेई उमेश इलेक्ट्रिक रेल्वेच्या ओव्हरहेड वायर्सच्या देखभालीसाठी टॉवर वॅगनला सोलापूर येथून कुर्डुवाडीला घेऊन येत होते. रुळावर दगड पाहिल्यानंतर त्यांनी २०० मीटर आधीच मालगाडी थांबवली आणि संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांना याची माहिती दिली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, तपास करत आहेत.

## गुजरातला जाणारे पाणी महाराष्ट्रात अडवले जाणार, धुळ्याच्या सभेत फडणवीसांनी सांगितले प्लानिंग

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्रात १ कोटींहून अधिक लखपती दीदी बनवणार तसेच १० लाख मुलांना रोजगार देणार असल्याची मोठी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. धुळे येथे झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. महाराष्ट्र सरकारकडून पहिल्या टप्पात २५ लाख लाखपती दीदी बनवणार तर पुढे एक कोटीपेक्षा अधिक लखपती तयार करणार असल्याचे ते म्हणाले. तसेच १० लाख मुलांना रोजगार देणार आहोत, असे ते म्हणाले. गुजरातला जाणारे पाणी महाराष्ट्रात अडवले जाणार असल्याचे नियोजन त्यांनी यावेळी सांगितले. देशात मोदी सरकार आणि राज्यातील युती सरकार जिल्ह्याचा दुष्काळाचा डाग पुसून टाकण्याचे कामं करीत आहोत.१४ वर्ष राज्यात आघाडी सरकार होते, या काळात २६ कोटी रुपये दिले गेले.महाराष्ट्राला बळीराजा योजनेत ३० हजार कोटी मिळाले.२४०७ कोटी जामफळ प्रकल्पला दिले. ५४ गावाचे सिंचन होणार आहे तर ४२ हजार हैक्टर जमीन बागात हीणार असल्याचे ते म्हणाले. ९.२४ ढ्वउ पाणी अडवून शेतात पाणी दिले जाणार आहे. आमच्या सरकारने विजेचे बिल माफ केले आहे. त्यामुळे आता कोणालाच बिल भरावे लागणार नाही. शेतकऱ्यांना १२ हजार मेगा व्हॅट वीज हरित वीज तयार करण्याचे नियोजन आहे.येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होणार असल्याचे ते म्हणाले.

## ढोल-ताशांचा गजरात सुलतानपुरात प्रकाशभाऊ डोंगरेच्या हस्ते बाप्पाची स्थापना



दैनिक आपला विदर्भ

**सुलतानपूर/ प्रतिनिधी** : सुलतानपूरातील मानाचा गणपती असलेला नवयुवक सार्वजनिक मंडळांचा बाप्पा शनिवारी मोठ्या जल्लोषात हजारो भाविकांच्या उपस्थितीत उदयपुरात विराजमान झाले. मेहकर विधान मतदार संघाचे जनतेच्या मनातील भावी आमदार तथा युवा सेना उपजिल्हाप्रमुख (उबाठा) प्रकाशभाऊ डोंगरे यांच्या हस्ते मंत्रोच्चारात ही प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. तत्पूर्वी, बाप्पाची ढोल-ताशा पथकांच्या गजरात मोठ्या थाटामाटात मिरवणूक काढण्यात आली होती, यामध्ये शेकडो भाविक सहभागी झाले होते.

यावेळी अध्यक्ष गोपाल खिल्लारी, उपाध्यक्ष शुभम सावळे , सदस्य प्रफुल्ल रिंढे,प्रकाश आकात, दामू कुडके,श्याम लहाने ,शिवाजी खिल्लारी ,ओम अवचार ,शुभम रिंढे , सोमेश खिल्लारी ,राम लहाने , पवन रिंढे ,गणेश रिंढे, आकाश रिंढे ,गोपाल रिंढे यासह अनेक गणेश भक्त उपस्थित होते. होऊ घातलेल्या मेहकर विधानसभा निवडणुकीत या मतदारसंघाच्या विकासाच्या माध्यमातून कायापालट करण्यासाठी सर्व जनतेला बळ दे, त्याचबरोबर शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळावा असे साकडे यावेळी प्रकाश डोंगरे यांनी बाप्पाला घातले..

# मी शहीद होण्यास तयार; मनोज जरांगेंच्या वक्तव्यामुळे राजकारणात खळबळ

दैनिक आपला विदर्भ

**जालना/ प्रतिनिधी** : गेल्या कित्येक दिवसांपासून मराठा आरक्षण प्रलंबित आहे. अशातच आता मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकार विरोधात पुन्हा एकदा मराठा आरक्षणासाठी एल्गार पुकारला आहे. कारण मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणासाठी उपोषणाचे हत्यार उपसले आहे. मराठा समाजाला ओबीसींतून आरक्षण द्यावे आणि सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी करावी ही मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसींतून आरक्षण द्यावे आणि सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी पुन्हा एकदा उपोषणाला बसणार आहेत. आरक्षणाच्या निर्णयामुळे फेब्रुवारी महिन्यापासून समाजाला वाट पाहावी लागली आहे. तसेच राज्य सरकारने कोणतीही स्पष्ट भूमिका जाहीर न केल्याने जरांगे पाटील यांनी उपोषणाची घोषणा केली आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या एक दिवसाअगोदर म्हणजेच १६ सप्टेंबर २०२४ पासून उपोषणाची सुरुवात करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांत अंतरवाली सराटीत मोठ्या घडामोडी घडल्या असल्याचे चित्र समोर आले आहे. मंत्री अब्दुल सत्तार यांनी मनोज जरांगे यांची भेट घेतली आहे. तसेच धनंजय मुंडे हे देखील अंतरवाली सराटीमध्ये दाखल झाले आहेत. त्यावेळी झालेल्या चर्चेनंतर जरांगे पाटील यांनी अचानक उपोषणाचे हत्यार उपसले हे समोर आले आहे.

यावेळी जरांगे पाटील यांनी मराठा समाजातील तरुणांना आत्महत्येसारखं टोकाचं पाऊल न उचलण्याचे आवाहन देखील केलं आहे. कोणत्याही कारणामुळे आत्महत्या बोलकूल करु नका, असे आवाहन त्यांनी तरुणांना केले आहे. तसेच तरुणांनी संयम ठेवावा.

याशिवाय लवकरच आरक्षणाचा प्रश्र्न सुटण्याचा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला आहे. मराठा आरक्षणासाठी मी मरायला देखील तयार आहे, काही आमदार माझे तुकडे करणार असे देखील ते म्हटले, तसेच मी शहीद होण्यास देखील तयार आहे असे जरांगे पाटील म्हणाले आहेत.



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# १३२ वर्षापूर्वी लोकमान्य टिळकांनी सर्वप्रथम गणेश मुर्तींचे प्रतिष्ठापना केली त्या चाळीत आजही तिच परंपरा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ब्रिटिशकाळात व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा आलेल्या असताना भारतीय लोकांनी एकत्र यावे, त्यांच्यात विचारांची देवाणघेवाण व्हावी या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात केली. टिळकांनी जेव्हा सार्वजनिक गणपती मंडळ स्थापन करण्याचे आवाहन केले तेव्हा ते पुण्यात होते. मात्र,सार्वजनिक गणपती मंडळे केवळ पुण्यापुरती मर्यादित राहण्या पेक्षा देशभर होणे गरजेचे होते. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत मुंबईतील गिरगाव येथील केशवजी नाईक चाळ येथे मुंबईकरांनी पहिला सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला. ती तारीख होती १४ सप्टेंबर १८९३ तेव्हापासून ते आतापर्यंत गिरगावातील या केशवजी नाईकांच्या चाळीमध्ये सार्वजनिक गणेशोत्सव अगदी चैतन्यमय वातावरणात साजरा होतोय. यंदा या मंडळाचं १३२वे वर्ष आहे.





लोकमान्य टिळकांनी दिलेल्या प्रेरणेतून साकारलेला हा गणेशोत्सव पाहण्यासाठी खुद्द टिळकांनी १९०१ साली मंडळाला भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी 'गृहस्थाश्रम' या विषयावर व्याख्यान दिलं होतं. त्यांच्या याच भेटीची आठवण म्हणून मंडळाने २००१ साली भेटीच्या शतकपूर्तीनिमित्त 'टिळकांचे पुनरागमन' हा कार्यक्रम आयोजित केला. ज्यात गिरगाव मधील प्रार्थना समाजपासून केशवजी नाईक चाळींपर्यंत नऊवारी साडीतल्या महिला ,ब्रिटिशकालीन फौजदार असे पोशाख करत टिळकांची प्रतिकात्मक मिरवणूक काढण्यात आली होती.

या मंडळाचे वेगळेपण आणि वैशिष्ट म्हणजे आपला सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा जपत टिळकांना अभिप्रेत असणारा गणेशोत्सव इथे साजरा होतो. गणपती बाप्पाचे आगमन, विसर्जन हे पालखी मिरवणुकीद्वारे केले जाते. बाप्पाची षोडशोपचार पूजा केली जाते. गणपतीच्या दिवसांत कीर्तन, भजन, व्याख्यानमाला असे प्रबोधनपर कार्यक्रम पार पडतात. लहान मुलांसाठी पाठांतर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आयोजित केल्या जातात. हे दहा दिवस ज्ञानदानाचे काम अखंडपणे सुरू असते. आतापर्यंत सचिन तेंडुलकर, अमिताभ बच्चन, कल्याणजी–आनंदजी, आणि त्यासोबत अनेक दिग्गजांनीही या मंडळाला भेटी दिल्या आहेत. याचसोबत बाळासाहेब ठाकरे यांनी सुद्धा केशवजी नाईक चाळ येथे भाषण केले होते. गणपती बाप्पाची मूर्ती जशी पहिल्या वर्षी होती तशीच आताही आहे. दरवर्षी दोन फूट उंचीच्या बाप् प्राणप्रतिष्ठा केली जाते. हा बाप्पा घडवणाऱ्या मूर्तिकारांची तिसरी पिढी सध्या हे काम पाहतेय.

गणेशोत्सव या शब्दातील 'उत्सव' हा शब्द महत्त्वाचा आहे. उत्सव हा माणसांना एकत्र आणण्यासाठी असतो, विचारांच्या देवाणघेवाणीसाठी असतो, परंपरा, संस्कृती जपण्यासाठी असतो. त्या उत्सवाचा इव्हेंट होऊ लागला की, मूळ उद्देशाला गालबोट लागू शकते. हे जपणारी काही मंडळे आजही मुंबईत आहेत आणि केशवजी नाईक गणेशोत्सव मंडळही त्यापैकीच एक आहे.

## संक्षिप्त...

### श्यामनिर्मल गणेश मित्रमंडळाने साकारले बुद्धीबळाच्या सोंगट्यांनी गणेशाची मुर्ती



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील मालाड मधील श्यामनिर्मल गणेश मित्रमंडळ दरवर्षी वेगवेगळे जनसंदेश देणारे देखावे गणेशत्सोवानिमित्त साकारते. यावर्षी श्यामनिर्मल गणेश मित्रमंडळाने चक्क चेस च्या सोंगट्यांनी गणेशाची मुर्ती साकारली आहे. ही मुर्ती बनवण्यासाठी त्यांना ५ ते ६ दिवसांचा कालावधी लागला. यातुन मुलांना बुद्धीबळ खेळाचे महत्व समजावे आणि मुलांनी गेम फक्त मोबाईलवर न खेळता प्रत्यक्षात खेळावा या संकल्पने मागचा हेतू आहे. या देखावा पाहण्यासाठी अनेक भाविकांनी या श्यामनिर्मल गणेश मित्रमंडळाला भेट दिली आहे.

### पुणे बेंगलोर महामार्गावरील वाडे फाटा येथे चालत्या शिवशाही बसला लागली आग




दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :** प्रवाशांना घेऊन पुणे बेंगलोर महामार्गावरून प्रवास करत असताना वाडे फाटा येथील एसटी महामंडळाच्या शिवशाही बसला अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. सुदैवाने सर्व प्रवासांनी वेळेत बसमधून खाली उतरल्याने यामध्ये कोणतीही जीवित हानी झाली नाही. साताऱ्यातील वाडे फाटा नजीक ही दुर्घटना घडल्याने सातारा शहरात या घटनेची चर्चा वाऱ्यासारखी पसरली. या आगीच्या दुर्घटनेची माहिती सातारा अग्निशमन दलाल कळतात तात्काळ अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेऊन या बसला लागलेली आग विजवून या आगेवर नियंत्रण मिळवले आहे. शिवशाही बसला कशामुळे आग लागली, याबद्दलचा अधिक तपास एसटी महामंडळ तसेच सातारा पोलीस करत असून सुखरूप असलेल्या प्रवाशांना दुसऱ्या एसटी बस मधून प्रवासासाठी पाठवण्यात आल्याची माहिती एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आली.

### गणपती आगमनानंतर सोनियाच्या पावलांनी गौराईचे मोठ्या जल्लोषात आगमन



दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :** गणपती आगमनानंतर नंतर सर्वांनाच वेड लागतं ते गौरी आगमनाचे. आपल्या लाडक्या भावाला माहेरी भेटायला येण्याची आतुरतेने वाट पाहत असलेल्या गौरी आगमन सणाची मोठी परंपरा आहे. या सणादिवशी आपल्या सासरी गेलेल्या लेकींना उत्साहात आणि आनंदामध्ये वाजत गाजत आपल्या घरी आणलं जातं आणि दोन दिवस तिला गोडधोड खायला घालून तिला पुन्हा सासरी पाठवले जातं. ही परंपरा आजपर्यंत चालत आलेली आहे. याच परंपरेनुसार आज साताऱ्यातील महिलांनी गौरीचे पारंपरिक गाण्याच्या तालावर उत्साहात आणि सोन्याच्या पावलांनी स्वागत केले. आपल्या लाडक्या गौराईला भाजी भाकरीचा नैवेद्य दाखवून तिची विधिवत पूजा केली जाते. तर उद्या याच गौराई समोर गोडधोड पदार्थ ठेवून तिला नैवेद्य दाखवला जाणार आहे. तर येणाऱ्या महिलांची करमणूक व्हावी, यासाठी तिच्यासमोर विविध सजावट आणि हलते देखावे सादर केले जाणार आहेत.

### तलाठी संतोष पवार खून प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा द्या,या मागणीसाठी सकल बौद्ध समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

दैनिक आपला विदर्भ

**हिंगोली/प्रतिनिधी :** आडगाव रंजे येथील तलाठी संतोष पवार हे तलाठी कार्यालयात कामकाज करीत असताना काही दिवसांपूर्वी भरदिवसा कार्यालयात आरोपीने तलाठी संतोष पवार यांच्या डोळ्यात चटणी पुड टाकून खुन केल्याची घटना घडली असुन पोलीसांनी या खुन प्रकरणातील आरोपीला अटक केली आहे. या खुन प्रकरणातील आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा द्या. मयत तलाठी कुटुंबातील लोकांना नोकरी द्या. मयत तलाठी कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत द्या, अशा विविध मागणीसाठी सकल बौध्द समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात मोठ्या संख्येने सकल बौद्ध समाजातील नागरीक तसेच महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

## कुटुंबभेट अभियानांतर्गत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी किसन नगर येथे लाभार्थी महिलांची घेतली भेट

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत कुटुंबभेट अभियान सुरु करण्यात आले आहे. या अभियानाच्या माध्यमातून सरकारच्या १० महत्त्वाच्या योजनांची माहिती देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वत: १५ महिलांच्या घरी जाणार आहेत.

तसेच त्यांनी कार्यकर्त्यांना देखील १५ कुटुंबाच्या घरी जाण्याचे आवाहन केले आहे. आज त्यांनी याची सुरुवात ठाण्यातून केली आहे. आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातील किसन नगर



येथे जात महिलांची त्यांच्या कुटुंबियांची भेट घेतली आणि त्यांच्याशी संवाद साधला आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अशीच चालू रहावी अशी भावना महिलेने व्यक्त केली आहे. किसननगरला येताना मला आनंद होतो आहे कारण इथूनच माझी सुरुवात झाली आहे. मी देखील चाळीत राहिलेला आहे म्हणून चाळीतील लोकांच्या अडचणी, दुख: काय आहेत हे मला माहित आहे त्यामुळे या सर्वसामान्य लोकांसाठी योजना सुरु करण्याची मला व सरकारला संधी मिळाली आहे ही माझ्यासाठी आणि आमच्या सरकारसाठी खूप मोठी गोष्ट आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेंतर्गत वर्षाला तीन गॅस सिलेंडर, पंपाने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना वीज बिल माफ केले आहे. हे सरकार शेतकऱ्यांना आधार देणारे, त्यांच्या मागे उभे राहणारे सरकार आहे.

विरोधकांना प्रत्येक निवडणुकीमध्ये खोटी आश्वासने देण्याची सवय होती त्यामुळे त्यांना वाटते की हे देखील खोटं आश्र्वासन आहे पण आम्ही जे बोलतो ते करतो व जे करणार आहोत तेच बोलतो. महिलांचा विकास तर देशाचा विकास आहे. टिका, आरोप करण्यापेक्षा मला काम करायचे आहे अशी प्रतिक्रिया यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली आहे.

## संकेत बावनकुळे यांच्यावर गुन्हा का दाखल केला नाही? पोलिसांचे उत्तर ऐकाच

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूरमध्ये भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुलाच्या गाडीने पाच दुचाकी आणि चारचाकी गाड्यांना धडक दिल्याची घटना घडली होती. रविवारी घडलेल्या घटने प्रकरणी पोलिसांनी एका वर गुन्हा दाखल केला आहे. तर संकेत बावनकुळे यांच्या दोन्ही मित्रांना या प्रकरणी जामीनसुद्धा देण्यात आला आहे. पोलिसांनी पत्रकार परिषद घेत याबाबत माहिती दिली. या अपघातावरून राज्यात विरोधकांनी भाजपसह महायुती सरकारवर आरोपही केले आहेत. या प्रकरणात संकेतला वाचवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. पोलिसांनी सांगितले की, दोन चार चाकी आणि एका दुचाकीला ऑडी कारने धडक दिली.

## मालेगाव येथील श्री १००८ वृषभनाथ दिगंबर जैन मंदिरात पर्युषण पर्व प्रारंभ



दैनिक आपला विदर्भ

■ प्रकाश भुरे

**मालेगाव :** मालेगांव येथील श्री १००८ वृषभनाथ दिंगबर जैन मंदिर येथे पर्युषण पर्वाला मोठ्या भक्ती भावात प्रारंभ झाला आहे येथील दिंगबर जैन मंदिरात या हि वर्षी जैन धर्मातील महान पर्व असलेले आणि सतत दहा दिवस चालणाऱ्या पर्युषण पर्वानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे या अंतर्गत रोज सकाळी ६:३० वाजता भगवंतांचा अभिषेक आणि रात्री ७.३० वाजता भगवंताची सामुहिक आरती व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करतात या कार्यक्रमाला मालेगाव शहरासह तालुक्यातील समस्त जैन बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहते या महान पर्वात जैन धर्मीय बांधव मोठ्या आनंदात व उत्साहात सहभागी होत आसतात या पर्युषण पर्वात जैन बांधव दहा दिवस उपवास करतात श्रावक तप व आराधना करतात पर्युषण पर्वाच्या अभिषेक पुजेला सकल जैन समाज बांधव उपस्थित असतात यावेळी मंदिरात अभिषेक आणि पुजेची बोली लावण्यात येते व बोली ची देणगी मंदिरच्या बांधकामाकरीता उपयोगी करण्यात येते व तसेच जैन समाजाच्या नवयुवक युवती यांनी दिंगबर जैन मंदिर रोषणाईने सजविण्यात आले

## महालक्ष्मी संस्थान देऊळगाव वळसा येथे यात्रा महोत्सव

दैनिक आपला विदर्भ

■ ईश्वर राठोड

**यवतमाळ :** १० सप्टेंबर ते १२ सप्टेंबर पर्यंत ज्येष्ठा गौरी आवाहन म्हणजेच महालक्ष्मी उत्सव संपूर्ण महाराष्ट्रभर मोठ्या उत्साहाने साजरा होत असून त्याचाच एक भाग म्हणून विदर्भातील एकमेव असलेल्या महालक्ष्मी मंदिर देऊळगाव वळसा येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे

संपूर्ण महाराष्ट्रात महालक्ष्मी चे फक्त तीन मंदिर असून मुंबई कोल्हापूर तथा विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात दारव्हा तालुक्यातील देऊळगाव वळसा या ठिकाणी विदर्भातील एकमेव महालक्ष्मी मंदिर असून या ठिकाणी यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्त मंडळी मोठ्या उत्साहाने दर्शनाकरिता येत असतात महालक्ष्मी स्वस्तांच्या वतीने सर्व सोयी सुविधा युक्त भाविक भक्तांसाठी प्रशस्त तयारी झालेली असून दिनांक १० सप्टेंबर पासून १२ सप्टेंबर पर्यंत महालक्ष्मी उत्सव साजरा होत असून या महालक्ष्मी उत्सवाची राज्यातील कानाकोपऱ्यातील भाविक भक्त मोठ्या उत्साहाने हा उत्सव साजरा करतात दिनांक १० सप्टेंबर रोजी महालक्ष्मी देवीच्या मूळ स्थानावरून पालखी काढून नवीन मंदिरापर्यंत पालखी आणल्या जाते मूळ स्थानावरून पालखी नवीन मंदिरामध्ये आल्यानंतर महालक्ष्मीची स्थापना करण्यात येते १० सप्टेंबरला सायंकाळी सहा वाजता महाआरती होणार असून या महाआरती करिता हजारो भाविक भक्त उपस्थिती लावतात त्याचप्रमाणे दिनांक ११ सप्टेंबर रोजी सकाळी सात



वाजता होम हवन होणार असून दुपारी अकरा वाजता महाआरती आणि संध्याकाळी सहा वाजता महाआरती महाआरती झाल्यानंतर लगेच महाप्रसाद दिनांक १२ सप्टेंबर रोजी दुपारी अकरा वाजता महाराष्ट्र राज्याचे मृदू व जलसंधारण मंत्री नामदार संजय राठोड यांचे शुभ असते महाआरती होणार असून महाआरतीनंतर महाप्रसादाच्या कार्यक्रमाला सुरुवात होईल तिनही दिवस या ठिकाणी भरगच्च कार्यक्रम होणार असून परिसरातील भाविक भक्तांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आलेले आहे दिनांक १२ सप्टेंबर रोजी दारव्हा येथून दिग्रस येथून आणि पुसद वरून भाविक भक्तांना येण्या जाण्याकरिता मोफत वाहनाची व्यवस्था दरवर्षीप्रमाणे याही वर्षी करण्यात आलेली आहे या यात्रेदरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे

## राजकोट येथील पुतळा कोसळल्याप्रकरणी

# शिल्पकार जयदीप आपटेला १३ सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी

दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्या प्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या पुतळ्याचा शिल्पकार जयदीप आपटे व बांधकाम रचना सल्लागार डॉ. चेतन पाटील यांना आज दुपारी मालवण येथील न्यायालयात हजर करण्यात आले. यात आपटे याला १३ सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी तर डॉ. चेतन पाटील याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. त्याची रवानगी सावंतवाडी कारागृहात करण्यात येणार आहे. राजकोट किल्ला येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना २६ ऑगस्ट रोजी घडली होती. याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पुतळ्याचा ठेकेदार जयदीप आपटे, तांत्रिक सल्लागार डॉ. चेतन पाटील या दोघांविरुद्ध विविध कलमान्वये येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या दोघांना १० सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. आज कोठडीची मुदत संपल्याने या दोघांनाही कडेकोट पोलीस बंदोबस्तात मालवण येथील न्यायालयात हजर करण्यात आले होते. मुख्य संशयित आरोपी जयदीप आपटे याची अजून चौकशी करायची असल्याने सात दिवसांची पोलीस कोठडी देण्यात यावी अशी मागणी सरकारी पक्षाच्या वतीने न्यायालयात करण्यात आली. त्यानुसार न्यायाधीश एम. आर. देवकाते यांनी त्याला १३ सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी तर चेतन पाटील याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. राजकोट किल्ला येथील पुतळा कोसळल्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी जयदीप आपटे याची पूर्ण चौकशी झालेली नाही. यात आणखी कोणाचा सहभाग आहे का? याचा पोलिसांकडून तपास व्हायचा आहे. तसेच लॅपटॉप अन्य साहित्य जप्त करायचे आहे. यांसह अन्य बाबींवर युक्तिवाद करण्यात आला. हा युक्तिवाद ग्राह्य मानत न्यायालयाने जयदीप आपटे याला १३ सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणातील दुसरा संशयित आरोपी चेतन पाटील याला न्यायालयीन कोठडी मिळाली असली तरी पोलीस या प्रकरणाच्या तपासासाठी त्याला पुन्हा ताब्यात घेऊ शकतात असे ॲड. भणगे यांनीस्पष्टकेले. तसेच राजकोट प्रकरणी आरोपी जयदीप आपटे विसंगत माहिती देतो आहे. त्यामुळे सात दिवसांची



पोलीस कोठडी मागीतली होती. परंतु, न्यायालयाने १३ तारखेपर्यंत (तीन दिवसांची) पोलीस कोठडी सुनावली आहे. तर आरोपी चेतन पाटील याला न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. नवीन कायद्यानुसार, पोलिसांना जेव्हा हा आरोपी हवा असेल त्यावेळी न्यायालयाच्या परवानगीने पोलीस त्याला ताब्यात घेऊ शकतात अशी माहिती सरकारी वकील ड.तुषारभणगे यांनी दिली आहे.

# डोणगावात वाहतूक व्यवस्थेचे तीनतेरा : अवैध वाहतूक जोमात

## पोलीस प्रशासन मुग गीळुन गप्प प्रवाशांच्या जीवाला धोका

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : डोणगाव येथे वाहतूक पोलिसांच्या आशीर्वादाने अवैध प्रवाशी वाहतुक करणार्या वाहनांनी मोठा कळस गाठला आहे. त्याचा ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

याबाबत आपला विदर्भ कडे नागरिकांनी तोंडी आपलं मत व्यक्त केलं असून आता मात्र तक्रारी वाढत असताना नव्याने आलेले जिल्हा पोलिस अधिकार्यारी या गंभीर बाबीची दखल घेतील.? मात्र स्थानिक पोलिसांचा अवैध प्रवाशी वाहतुकीवर कुठलाच अंकुश राहिलेला नाही.



छत्रपती संभाजीनगर– नागपूर महामार्गावरील असलेले डोणगाव,अंजनी खंडाळा, तसेच डोणगावातून इतर जिल्ह्यात जाणारी वाहने पिंपरी सरत. कुकसा व इतर ठिकाणी – मार्गावर दिवसाढवळ्या वाहतूक होत असताना, पोलिसी कारवाईचा दंडुका मात्र म्यान झालेला दिसत आहे.

डोणगाव हे मोठ्या गर्दीचे ठिकाण आहे. डोणगाव या गावाला जवळपास ३२ खेडेगाव जोडलेले आहेत त्यामुळे येथे येणाऱ्यांची संख्या जास्त असल्याने या मार्गावर अवैध प्रवासी वाहतूक करणार्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. या वाहनामुळे अनेक वेळा अपघात होऊन, यात अनेकांचा बळी गेला आहे.

महिन्याच्या पहिल्या आठवड्यात डोणगाव रस्त्यावर दिसणारे वाहतूक पोलिस इतर दिवशी वाहतुकीचा खेळखंडोबा झालेला असताना, तेथून गायबच असतात. वर्तमानपत्रात बातम्या आल्या की, थातूरमातूर कारवाई करून, पुन्हा अवैध वाहतुकीला पाठीशी घातले जाते, अशी अवस्था आहे.

बेशिस्त वाहतुकीने कळस गाठल्याने नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. प्रवाशांची अवैध वाहतूक करणारी वाहने, ऑटोचालकांच्या मनमानीमुळे सामान्य नागरिकांना वेठीस धरले जात आहे. अवैध वाहतूक करणारी वाहने, ऑटो, दुचाक्या, मालवाहू वाहने वाटेल तिथे मनमानी पद्धतीने उभी केली जातात. प्रवासी मिळविण्यासाठी ही वाहने एकदम येऊन मधेच उभी राहत असल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. वाहतुकीवर याचा परिणाम होत आहे. विविध ठिकाणी वर्दळीच्या मार्गावर अशी बेशिस्त वाहतूक असून, रस्त्याच्या कडेला अस्ताव्यस्त वाहने उभी केली जातात.

डोणगाव रस्त्यावर सर्वाधिक शाळा, महाविद्यालय आहे. या रस्त्यावरून जाणारे अवैध प्रवासी वाहतूक करणारी वाहने भरधाव वेगात जातात. त्यांच्यावर कुणाचाच अंकुश नसल्याने जीव मुठीत घेऊन विद्यार्थ्यांना ये–जा करावी लागते. या सर्व गोष्टीकडे वरिष्ठांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. अवैध वाहतुकीकडे पोलिसांची डोळेझाक या रस्त्यांवर वाहतूक पोलिस उभे असताना, त्यांच्या डोळ्यादेखत कुठेही वाहने उभी केली जातात. अवैध वाहतूक करणारी वाहने प्रवाशांनी गच्च भरून पोलिसांच्या डोळ्यादेखत भरधाव धावतात. परंतु, पोलिस याकडे डोळेझाक करतात, असा आरोप नागरिकांनी केला आहे.

## वृत्तविशेष...

### सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल येथे विद्यार्थ्यांना सायकल वाटप



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

लोणार : १० सप्टेंबर २०२४ रोज मंगळवार रोजी सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल लोणार येथे मानव विकास मिशन अंतर्गत सायकल वाटप करण्यासाठी स्टेट बँक लोणार पासून सायकल ची भव्य रॅली लेझिम पथक बँड सह रॅली काढून शाळेच्या भव्य प्रमाणात लोणार पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी जंगल सिंग राठोड तसेच महिला विकास महामंडळाच्या अध्यक्ष श्रीमती उषा ताई फड,तसेच संस्थेचे सन्माननीय उपाध्यक्ष गिरिधर ठाकूर,शाळेचे मुख्याध्यापक डोळे भाऊसाहेब व पर्यवेक्षक सांगळे सर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर बंधू भगिनी यांनी व्यवस्थित नियोजनातून हा कार्यक्रम संपन्न केला. सदर कार्यक्रमाला मेहकर विधानसभा मतदार संघाचे आमदार डॉ संजय रायमुलकर सह अनेक मान्यवर उपस्थित होते

### एकनाथ खडसे यांची भूमिका दुटप्पी; त्यांचा जर भाजपमध्ये प्रवेश झाला असेल तर त्यांनी फोटो किंवा व्हिडिओ जाहीर करावे



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : सुलवाडे जामफळ धरणावरून शिंदखेडा तालुक्यातील ५४ गावांना शेतीसाठी थेट पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या 'बंदिस्त पाईप वितरण प्रणाली' योजनेचे भूमीपूजन आज राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांच्यासोबत धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन देखील उपस्थित होते यावेळी गिरीश महाजन यांनी पत्रकारांशी बोलताना एकनाथ खडसे यांच्यावर टीका केली आहे.

एकनाथ खडसे हे मोठे नेते आहेत, आणि ते सांगत आहे की माझा प्रवेश पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्या उपस्थित झाला आहे. अमित शहा यांनी माझ्या गळ्यात मफलर टाकल असं ते सगळ्यांना सांगत आहे. यांच काय चाललं आहे हेच मला कळत नाही. दुसरीकडे ते सांगत आहे की महाविकास आघाडीला आम्ही निवडून आणू आणि मला भाजपा मध्ये प्रवेश करायच आहे. अशी दुटप्पी भूमिका त्यांची आहे. एकनाथ खडसे यांना आपल्याच घरामध्ये सगळे पक्ष आणि सगळी पदे हवे आहेत. चुकून जर महाविकास आघाडीचे सरकार आले तर त्यांच्या मुलीला त्यांना मंत्री करायचे आहे. त्यामुळे अशी दूटप्पी भूमिका आमच्याकडे चालणार नाही आणि त्यांचा जर तसा भाजपमध्ये जाहीर प्रवेश झाला असेल तर त्याचे फोटो किंवा व्हिडिओ जाहीर करावे असे आवाहन गिरीश महाजन यांनी यावेळी केले.

### धार्मिक कार्यासाठी गंगाजल : आपल्या पोस्ट ऑफिसमध्ये

**बुलडाणा/प्रतिनिधी** : डाक विभागामार्फत धार्मिक कार्यात,सणवारामध्ये उपयुक्त असे पवित्र गंगाजल आपल्या डाक विभागामार्फत पोस्ट ऑफिस मध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे. डाक विभागामार्फत खास गंगोत्री येथून सदर गंगाजल व्यवस्था केली जाते. गंगाजल फक्त रु.३५ रुपये प्रती बॉटल (२०० मीली) प्रमाणे बुलढाणा आणि खामगाव मुख्य डाक घर येथे उपलब्ध आहे. तरी नागरिकांनी डाक विभागाच्या या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन मा. डाक अधिक्षक, गणेश अंभोरे, बुलडाणा विभाग, बुलडाणा यांनी केले आहे.***

मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षणार्थी भरती मेळावा.

बुलडाणा,(जिमाका),दि.१० : तरुणांना शिक्षणा नंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण मिळावे व त्यांना रोजगार मिळण्याची संधी वाढावी या साठी राज्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. यातुन उद्योजक, खाजगी अस्थापना, सेवा क्षेत्र तसेच केंद्र आणि राज्य शासनाच्या शासकीय तसेच निमशासकीय आस्थापनांना मनुष्यबळ मिळणार आहे. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्या अंतर्गत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगाव, जि. बुलढाणा, येथे दि. २४ सप्टेंबर २०२४ व ANS Infovally खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगाव, जि. बुलढाणा, येथे दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत कार्य प्रशिक्षणार्थी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. भरती मेळाव्यामध्ये शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांना आमंत्रीत करण्यात येत आहे. सदर मेळाव्या मध्ये सहभागी होण्याकरीता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा . वय १८ ते ३५ वर्ष असणे गरजेचे आहे. उमेदवार किमान १२ वी उत्तीर्ण व कमाल पदव्युत्तर पदवी धारक असावा. उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाच्या www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी व वरील नमूद असलेल्या तारखेस संबंधित स्थळी उपस्थित राहून ह्या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था खामगाव चे प्राचार्य तथा मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, खामगाव चे सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार एस. डी. गंगावणे यांनी केले आहे.

## गोमाळ येथे अशुध्द पाण्यामुळे १०६ रुग्णांना जुलाबाचा त्रास झाल्याचे तपासात निष्पन्न; जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा खुलासा

### नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून व निर्जंतुकीकरण करुन पिण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : जामोद तालुक्यातील गोमाळ येथे उपकेंद्र, भिंगारा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास दिनांक ९ सप्टेंबर, २०२४ रोजी आ. संजयजी कुटे यांचे सोबत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल राम गिते, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हरी पवार, तसेच जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे यांनी मौजे गोमाळ येथे भेट देऊन सद्यस्थितीची माहिती घेतली होती. मौजे गोमाळ येथे दिनांक ७ सप्टेंबर, २०२४ रोजीपासून ताप, सर्दी, खोकला, डोकेदुखी, हगवन अशी लक्षणे असलेले १०६ रुग्ण आढळले असून त्यामध्ये २६ रुग्णांना जुलाबचा सौम्य त्रास असल्याचे दिसून आले. गावातील काही नागरिकांनी अशुध्द पाणी पिल्यामूळे सदर जुलाबाचा त्रास झाल्याचे निष्पन्न झाले आहे. मौजे गोमाळ मध्ये विविक्षीत कक्ष स्थापन करण्यात आला असून तेथे वैद्यकिय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक व इतर आरोग्य कर्मचारी २४ तास उपस्थित असुन गावामध्ये अधिकारी, कर्मचारी यांच्यामार्फत रुग्णांवर औषधोपचार करण्यात येत आहे. या गावातील पिण्याच्या पाण्याच्या विहीरीमध्ये ब्लिचिंग पावडर टाकून दैनंदिन क्लोरीनेशन करण्यात येत आहे. गावामध्ये घरोघरी मेडीक्लोर वाटप करण्यात आले असून नागरिकांना पिण्याचे पाणी उकळून पिण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत रुग्णांची परिस्थिती नियंत्रणात आली असून भरती करण्यात आलेल्या रुग्णांना उपचार पश्र्चात प्रकृती ठिक असल्यामूळे सुटी देण्यात आली आहे. मौजे गोमाळ येथे ३ रुग्णांचा मृत्यु झाली असून नातेवाईकांनी मृत्यु झालेल्या रुग्णांचे शवविच्छेदन (पोस्टमार्टम) करण्यास नकार दिल्यामूळे मृत्युचे कारण निश्र्चितपणे सागंता येणार नाही. याबाबत इतर वृत्तपत्रामध्ये २०० पेक्षा जास्त अतिसाराचे लक्षणे असलेले रुग्ण आढळून आले. अशी आकडेवारी दाखवण्यात आलेली असून सदर आकडे वस्तुस्थिती दर्शक नाही. सदर आजार हा कॉलरा, पटकी नसून नागरिकांनी भयभित होऊ नये. जिल्ह्यामधील सर्व नागरिकांनी पाणी उकळून व निर्जंतुकिकरण करुन पिण्यासाठी वापरावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आरोग्य विभागामार्फत जिल्हास्तरावर तथा तालुका स्तरावर साथरोग प्रतिबंधात्मक, जलशुध्दीकरण, मान्सूनपुर्व तयारी बाबत सरपंच, ग्रामसेवक, आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेण्यात आलेले आहे. तसेच जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने ग्रामपंचायत कार्यालय, पंचायत समिती कार्यालय यांना याबाबतच्या करावयाच्या उपाययोजनाबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना लेखी स्वरुपात देण्यात आलेल्या आहेत, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी, बुलढाणा यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

## ज्वारी खरेदी नोंदणीसाठी ३० सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : हमी दराने भरडधान्य ज्वारी खरेदीसाठी पुरेशी नोंदणी झालेली नाही. शासनाकडून भरडधान्य खरेदीकरीता ऑनलाईन शेतकरी नोंदणी साठी दि. ३० सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. जिल्ह्यामध्ये केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत राज्य शासनातर्फे शेतकऱ्यांचे हमी दराने भरडधान्य ज्वारी नोंदणीसाठी यापुर्वी दि. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. परंतू मागील हंगामामधील ऑनलाईन शेतकरी नोंदणी आणि रब्बी हंगाम २०२३–२४ मधील शेतकरी नोंदणी पाहता रब्बी पणन हंगाम २०२३–२४ मध्ये भरडधान्य खरेदीकरीता शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी पुरेशी झाली नाही. त्यामुळे शासनाकडून भरडधान्य खरेदी करीता ऑनलाईन शेतकरी नोंदणीसाठी दि. ३० सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

## शेतकऱ्यांनी कर्जमुक्ती प्रोत्साहनपर लाभ योजना मयत वारस कर्ज खात्याबाबत

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेमध्ये पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण करण्यापूर्वीच निधन झाल्याने त्यांना प्रोत्साहन लाभ रक्कम अदा करता आलेली नाही, अशा मयत शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत महा–आयटीकडून आदर्श कार्यपध्दती प्राप्त झालेली आहे. मयत शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची माहिती योजनेच्या संगणकीय प्रणालीवरून काढून टाकण्याची सुविधा बँकांना दि. १७ स्पटेंबर २०२४ पर्यत कालावधीत उपलब्ध राहील. मयत शेतकऱ्यांच्या वारसांची नोंद संबंधीत कर्जखात्यास करुन त्याबाबतची माहिती संगणकीय प्रणालीवर सादर करण्याची सुविधा दि. १८ सप्टेंबर २०२४ ते दि. २६ स्प्टेंबर २०२४ या कालावधीत उपलब्ध राहील. तथापि प्रोत्साहनपर लाभ योजनेमध्ये पात्र ठरलेल्या मयत शेतकऱ्यांच्या वारसांनी आवश्यक कागदपत्रे संबंधीत बँकेकडे विहीत कालावधीमध्ये जमा करावी. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप आधार प्रमाणिकरण केलेले नाही, अशा शेतक–यांनी संबंधीत बँक शाखांशी संपर्क साधुन दि. १८ सप्टेंबर २०२४ पर्यंत आधार प्रमाणीकरण पुर्ण करुन घ्यावे. असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांचे मार्फत करण्यात येत आहे.

## नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण निराकरणासाठी 'आपले सरकार पोर्टल २.०' उपयुक्त प्रणाली – जिल्हाधिकारी किरण पाटील

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : सर्वसामान्य नागरिक हा आपल्या शासन, प्रशासनाचा केंद्रबिंदू आहे. त्याच्या तक्रारींचे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण निराकरणासाठी 'आपले सरकार पोर्टल २.०' ही प्रणाली उपयुक्त आहे. या प्रणालीद्वारे प्राप्त तक्रारींचा निपटारा विहीत कालावधीत करण्याला सर्व शासकीय विभागांनी प्राधान्य द्यावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी दिल्या. यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार , अपर पोलीस अधीक्षक खान, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पोळ, प्रशिक्षक देवांग दवे, विनोद वर्मा, बुलढाणा उपविभागीय अधिकारी शरद पाटील, सिंदखेड




राजा उपविभागीय अधिकारी संजय खडसे, मलकापूर उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे , तहसिलदार संजीवनी मुपडे यांच्यासह जिल्हास्तरीय शासकीय विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तक्रारींचा निपटारा गतिमान होण्यासाठी आपले सरकार पोर्टलमध्ये नव्याने काही बदल करण्यात आले आहेत. या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारींचा संवेदनशीलपणे निपटारा होण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या संकल्पनेतून आपले सरकार पोर्टलबाबत जिल्हास्तरीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणातून प्रणालीचा प्रभावी वापर कशाप्रकारे करावा, याबाबत प्रशिक्षक देवांग दवे यांनी माहिती दिली. या माहितीचा वापर प्रत्यक्ष कामकाजात करून नागरिकांच्या तक्रारींचा तातडीने निपटारा करावा, असे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सांगितले. नागरिकांना आपल्या तक्रारी घरातून, गावातूनच शासन, प्रशासनापर्यंत पोहचविता याव्यात, यासाठी आपले सरकार पोर्टल तक्रार निवारण प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

## कोसदणी घाटात चारचाकी वाहनाचा अपघातात नवरीच्या आईचा दुर्दैवी मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

■ ईश्वर राठोड

**यवतमाळ** : नागपूर तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग वरील आर्णी तालुक्यातील कोसदणी घाटात काल दिनांक ९ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री १२:३० वाजताच्या दरम्यान एका चारचाकी वाहन स्कॉर्पिओ एन क्र . एएम एच २६ सी इ २३२२ ला अपघात झाल्याची घटना घडली असून यामध्ये एका ५० वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे संतोषी प्रवीण नार्लावार वय वर्ष ५० रा. साई नगर किनवट असे मृतक महिलेचे नाव आहे किनवट येथील नेहा प्रवीण



नार्लावार वय वर्ष २२ व नांदेड येथील प्रज्वल पद्माकर गादेवार वय वर्ष २५ यांचे लग्न येत्या नोव्हेंबर महिन्यात केदारनाथ बद्रीनाथ येथे होणार होते लग्नाच्या कापड खरेदीसाठी दोन्ही कुटुंबातील पद्माकर मधुकर गादेवार वय वर्ष ५७, भाग्यश्री पद्माकर गादेवार वय वर्ष ५२, प्रज्वल पद्माकर गादेवार वय वर्ष २५ तीन्ही रा. नांदेड , मृतक संतोषी प्रवीण नार्लावार वय वर्ष ५०, नेहा प्रवीण नार्लावार वय वर्ष २२, रिया प्रवीण नार्लावार वय वर्ष १८ तिन्ही रा. साईनगर किनवट असे दोन्ही कुटुंबातील एकूण ६ जण अमरावती येथे जावुन कापड खरेदी केली.

परतीच्या प्रवासात नागपुर तुळजापुर महामार्गावरील आर्णी तालुक्यातील कोसदणी घाटात नवरदेवाचे वडील पद्माकर मधुकर गादेवार हे वाहन चालवीत असताना अचानक त्यांचा वाहणावरील ताबा सुटल्याने सदर वाहन घाटातील दरडीला भिडुन फरफटत गेली व तीन ते चार पलट्या त्या वाहनाने मारले यामध्ये वाहनातील नवरीची आई संतोषी नार्लावार यांचा घटणास्थळीच दुर्दैवी मृत्यु झाला वाहनातील तिन व्यक्ती गंभिर जख्मी झाल्याची माहीती आहे सर्वांना तात्काळ आर्णी ग्रामीण रुग्णालयात उपचाराकरिता हलविण्यात आले व गंभीर जखमी असलेल्या रुग्णांना पुढील उपचाराकरिता यवतमाळ येथे हलविण्यात आले आहे.

सदर घटनेची तक्रार आर्णी पोलिसात प्रवीण चंद्रकांत नार्लावार यांनी आपल्या होणाऱ्या इवाई विरोधात दिली असून इवाई पद्माकर मधुकर गादेवार रा. जुना मौंढा ता. जी. नांदेड यांनी भरधाव वेगाने व निषकाळजी वाहन चालवून तक्रारदार यांच्या पत्नीच्या मृत्यूस कारणीभूत ठरला अश्या तक्रारी वरून आर्णी पोलिसांनी वरील आरोपी विरोधात विविध कलमान्वये गुन्हा नोंद केला आहे सदर अपघातग्रस्त झालेल्या वाहनात नवीन खरेदी केलेले सामान व मृतकाच्या गळ्यातील पोत महामार्ग पोलिसांनी आर्णी ग्रामीण रुग्णालयात मध्यरात्रीला येऊन नार्लावार कुटुंबियांच्या स्वाधीन केले मृतक महिलेला शैवविच्छादन गृहात पाठविण्यात आले आईचा दुरदैवी मृत्यृ झाल्याने तिन्ही मुलींसह नार्लावार कुटुंबियांवर लग्ना अधिच दु:खाचा डोगर कोसळला आहे अपघातातील जखमींना मदत करणारे महामार्ग पोलीस मदत केंद्र उमरखेड येथील पोलीस उपनिरीक्षक विकास खडसे, पोलीस हवालदार विनोद राठोड, सुभाष नागदिवे,माधव आत्राम तसेच आर्णी पोलीस स्टेशनचे बिट जमादार सतीश चौदार,राजेश जाधव, राम ढाकणे, असिफअली खल्लीखाऊ, चालक समीर बन,यांनी मदत केली